५।५

कायम विनाअनुदान तत्वावरील शासन
मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना
नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया
मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. : व्हीएलएस १००२(१०००/०२)/प्राशि-३.
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:२३ सप्टेंबर २००३.
संदर्भ :- शासन निर्णय, समक्रमांक, दि. १४ जानेवारी २००३

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदान तत्वावरील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. याच धर्तीवर कायम विनाअनुदान तत्वावरील इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासनाकडून सध्या खाजगी प्राथमिक शाळांना " कायम विनाअनुदान " तत्वावर परवानगी देण्यात येत असल्याने इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या शाळांना इयत्ता पहिलीच्या प्रथम वर्गास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिल्यानंतर त्याच तत्वावर अशा शाळांना आवश्यकतेनुसार इ. २ री ते ७ वीपर्यंतचे नैसर्गिक वाढीचे वर्ग तसेच अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याचे अधिकार यापुढे त्या संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना व महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांच्या बाबतीत संबंधित प्रशासन अधिकारी/ शिक्षणाधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना या शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

Neelam P.
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

३.    महानगरपालिका क्षेत्रातील कायम विनाअनुदान तत्वावरील इंग्रजी माध्यमाच्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याचे अधिकार यापुढे संबंधित प्रशासन अधिकारी/शिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना राहतील.

४.    कायम विनाअनुदान तत्वावरील इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना मंजूर करावयाचे नैसर्गिक वाढीचे वर्ग तसेच अतिरिक्त तुकडयांची गरज आहे, याची खातरजमा केल्यानंतरच वर्ग/तुकडया मंजूर करण्यात याव्यात. तसेच सदर मंजूरी कायम विनाअनुदान तत्वावर द्यावयाची असल्याने संबंधित संस्थांकडून भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र घेऊनच मंजूरी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शा. पां. जोशी )
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद.
सर्व प्रशासन अधिकारी/शिक्षण अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ
कार्यासन माशि-१/ उमाशि-१, शालेय शिक्षण विभाग
निवड नस्ती, प्राशि-३

वरील शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. संगणक संकेतांक क्र. 20070920164753OC असा आहे.

# कायम विनाअनुदानित तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

महाराष्ट्र शासन

क्रमांक : नमाशा २००६/(१५८/०६)/माशि १
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २००६.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर/कोल्हापूर.

विषय : २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत...
संदर्भ : शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७ मे, २००३.

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या सहपत्रातील एकूण ४४५ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे:-

१) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३) शासन निर्णय दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपद्धती संस्थेवर बंधनकारक राहतील.
४) संस्थेच्या अध्यक्षांकडून कायम विनाअनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.
५) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
६) "कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा" असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संबंधि संस्थेवर बंधनकारक राहील.

Neelam P
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

७) सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/ शासनाशी पत्रव्यवहार करताना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरणपणे पालन करणे आवश्यक आहे.

९) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावेत.

३. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन, संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) "कायम विनाअनुदान" तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

६. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१७१७२९०१००१** असा आहे.

(न.ग.तडवी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत - माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.

मा.शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांचे खाजगी सचिव.

मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

निवड नस्ती (माशि १)

शासन पत्र क्रमांक : नमाशा २००६/(१५८/०६)/माशि १, दिनांक १६ मे, २००६ चे सहपत्र.

कायम विनाअनुदान तत्वावरील नवीन माध्यमिक शाळा

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता |
|---|---|---|---|
| | १६ | | |
| २०३ | श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, तळेगाव ढमढेरे, ता.शिरुर | कोढापूरी, ता.शिरुर | ८ वी |
| २०४ | दि बिशप ए.सो.पुणे | कल्याणीनगर, पुणे | ८ वी |
| २०५ | गेनबा सोपनराव मोझे शिक्षण संस्था येरवडा, पुणे | लोहगाव, पुणे | ८ वी |
| २०६ | जुन्नर प्रोगेसिव्ह ए.सो.जुन्नर | जुन्नर | ८ वी |
| २०७ | कै.बबनराव महादू काटे शि.सं.पिंपळेसौदागर, पुणे २७ | पिंपळेसौदागर | ८ वी |
| २०८ | झिल ए.सो.स.न.२५/३/३ हिंगणे खु.सिंहगड रोड, पुणे | हिंगणे खु. पुणे | ८ वी |
| २०९ | कॅरियर इन्स्टिट्यूट ट्रस्ट त्रिदेव गवळीवाडा नाका लोणावळा | लोणावळा, पुणे | ८ वी |
| २१० | विद्यानिकेतन ए.ट्रस्ट भागरवाडी लोणावळा | लोणावळा, पुणे | ८ वी |
| २११ | जोग ए.ट्रस्ट पुष्कराज शिवाजीनगर, पुणे | चिंचवड, पुणे | ८ वी |
| २१२ | पश्चिम महाराष्ट्र ए.ट्रस्ट रविवार पेठ, पुणे | कोंढवा, खु. | ८ वी |
| २१३ | अरवींद ए.सो.शितोळेनगर ३१ सांगवी पुणे | संगवी | ८ वी |
| २१४ | पीएस डीशास्त्री ए.फाउडेंशन कोथरुड, पुणे | शिवणे | ८ वी |
| २१५ | ज्ञानदा विद्यापीठ अरण्येश्वर शिक्षण संस्था सहकार नगर, पुणे ९ | सहकार नगर, पुणे | ८ वी |
| २१६ | छ.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगवी, पुणे २७ | सांगवी, पुणे | ८ वी |
| २१७ | मराठवाडी प्रतिष्ठाण २८/३१० प्राधिकरण निगडी, पुणे | चिखली, पुणे | ८ वी |
| २१८ | भारती विद्यापीठ लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे | बालेवाडी, पुणे | ८ वी |
| २१९ | डी एस कुलकर्णी ए.ट्रस्ट ११८७/६० पुणे ५ | धायरी, पुणे | ८ वी |
| २२० | साधवी प्रिती सुधाजी ए.प्रति स.न.३ हिंजवडी, पुणे ३७ | जाधववाडी, चिखली | ८ वी |
| २२१ | कांती शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर, जि.लातूर | कोंढवा, पुणे | ८ वी |
| २२२ | ज्ञानवर्धिनी प्रतिष्ठाण ६१/१/१५ पिंपळेसौदागर, पुणे | कृष्णानगर | ८ वी |
| २२३ | रोझरी ए.सो.आंबेडकररोड, पुणे | कोंढवा | ८ वी |
| २२४ | श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी, ता.आंबेगाव | लांडेवाडी, ता.आंबेगाव | ८ वी |
| २२५ | सुकुल ए.सो.सि एम माउली छाया लोणीकाळभोर स्टेशनजवळ, ताहवेली | लोणी काळभोर, ता.हवेली | ८ वी |
| २२६ | रोझरी ए.सो.आंबेडकर रोड, पुणे | पुणे | ८ वी |

कायम विना-अनुदान तत्वावर.

क्र. प्राशि/.......... ९०४८३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 31 AUG 1998

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, ...पुणे......

विषय = सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत....

संदर्भ = शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक - व्हीएलएस = [illegible]

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९८ पासून इयत्ता १ली ते ४थी पर्यंत सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस - शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर कायम विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | अरविंद एज्युकेशन सोसायटी ३१ शितोळेनगर सांगवी ता. हवेली जि. पुणे - २७ | लिटिल फ्लॉवर इंग्लिश मिडीयम स्कूल नवी सांगवी पुणे २७ | १ली ते ४थी | इंग्रजी |

२.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताधारक आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. अशाप्रकारे नियुक्त केलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत/निवृत्ती वेतनाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. वेतन व निवृत्तीवेतन विषयक फायदे संबंधित संस्थांनीच द्यावे लागतील.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पद्धती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

Neelam P
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

२.६ संस्थेने शालेय [illegible]

विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा नियमीतपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरू न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज समक्ष क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहनेत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचो गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा.

[illegible]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे = १.

प्रत : प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका,
शिक्षण मंडळ, [illegible] .............. जिल्हा पुणे ......... यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : मा. सचिव,
अरविंद एज्युकेशन सोसायटी [illegible] २१ [illegible], जि. पुणे ४११ ०२७.
..........................................
यांना माहितीसाठी अग्रेषित.

क्रमांक–शिमं/आप्रा. १/३/कावि/ ५५५ /२००४
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
दिनांक – १ /३ /२००४

प्रति;

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~लिटील फ्लॉवर प्राय.~~
इंग्लिश मेडि. स्कूल सांगवी.

विषय :– कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :– १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[१०००/०२] /प्राशि–३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. २०/२/०४ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या वर्गांना २००३ – २००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी नांव नैसर्गिक का अतिरिक्त | ~~विना अनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १) | लिटील फ्लॉवर प्राय. इंग्लिश मेडि. स्कूल, सांगवी | इंग्रजी | इ.३ ते इ.६ वी | नैसर्गिक | फक्त प्रथम वर्षास मंजूरी |

U. Harshag
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE 27

Little Flower English Medium School
Sangvi Pune-27

Neelam P.
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृह व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी-

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

क्रं.-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३३/२०१०
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
दिनांक :-०७/ ०१/२०११.

प्रति,

मुख्याध्यापक,
लिटील प्लोअर प्रायमरी स्कुल,
३१, शितोळे नगर, सांगवी, पुणे

**विषयः- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत ( माध्यमः- इंग्रजी )**

संदर्भः- १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिः-१४ जानेवारी २००३.
२) आपणांकडील दिनांकः- ०३/०८/२०१०. चा प्रस्ताव.

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकडया/वर्गांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं | शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक/ अतिरिक्त | अनुदानाचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिटील प्लोअर प्रायमरी स्कुल, शितोळेनगर, सांगवी पुणे | इंग्रजी | ७ वी | नैसर्गिक. | इयत्ता ७ वी -- २०१०-११ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित तत्वावर प्रत्येकी प्रथम वर्ग मंजूर |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) पुढील वर्षी पटसंख्या वाढविण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

Neelam P
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ, पिं-चिं म.न.पा.
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१

क्रं.-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३३/२०१०
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
दिनांक :-०७/ ०१/२०११.

प्रति,

मुख्याध्यापक,
लिटील प्लोअर प्रायमरी स्कुल,
३१, शितोळे नगर, सांगवी, पुणे

विषयः- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत ( माध्यमः- इंग्रजी )

संदर्भः- १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिः-१४ जानेवारी २००३.
२) आपणांकडील दिनांकः- ०३/०८/२०१०. चा प्रस्ताव.

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकडया/वर्गांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं | शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक/ अतिरिक्त | अनुदानाचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिटील प्लोअर प्रायमरी स्कुल, शितोळेनगर, सांगवी पुणे | इंग्रजी | ७ वी | नैसर्गिक. | इयत्ता ७ वी -- २०१०-११ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित तत्वावर प्रत्येकी प्रथम वर्ग मंजूर |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) पुढील वर्षी पटसंख्या वाढविण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

Neelam P
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ, पिं-चिं म.न.पा.
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१

परवानगी वर्ष : २००५ - २००६
माध्यम : इंग्रजी

जा.क्र.माध्य.३(१२)/प्रथम मान्यता/पुवि/२००८-०९/ 30520-29
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक : 27 OCT 2008

कायम विना अनुदान

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता ... २००५-०६.
संदर्भ :१. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य-९/१४०९/२००८ दि. २३/१०/०८
२. शा.प.क्र.नमाशा- २००६/[१५८/०६]/माशि-१ दि. १६/५/२००६
३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य-३/१२/नमाशा/मान्यता/पुवि/०८ दि. १३/१०/०८

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये अरविंद ए. सो. शितोळेनगर, ३१ सांगवी, पुणे. संस्थेच्या लिटील फ्लॉवर सेकंडरी स्कुल, सांगवी, पुणे. माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २०० ५ पासून कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे, सदर मान्यता खालील अटींची पुर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पुर्तता शाळा करीत आहे किंवा कसे ? याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

टिप- विद्यार्थी संख्या वाढविणेचे अटीवर जून ०५ पासून इ. ८ वीच्या वर्गास प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

Neelam
HEADMISTRESS
LITTLE FLOWER PRIMARY SCHOOL
SANGVI, PUNE - 27

(बाळासाहेब अडसूळ)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१, करिता.

उप शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

२००५ - २००६ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २०० ५ पासून कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे, सदर मान्यता खालील अटींची पुर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पुर्तता शळा करीत आहे किंवा कसे ? याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

टिप- विद्यार्थी संख्या वाढविण्याचे अटीवर जून ०५ पासून इ. ८ वीच्या वर्गास प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

सही अ.......

(बाळासाहेब .....)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

मुख्याध्यापक लिटील फ्लॉवर सेकंडरी स्कुल, सांगवी, पुणे.

निवडनस्ती.